# Maharashtra Information Technology Corporation Ltd.

(A Government of Maharashtra Enterprise)

MahaIT
IMAGINE INVENT INSPIRE

**Branch Address** : 3rd Floor, Apeejay House, Dinshaw Vacha Road, Near K. C. College, Churchgate, Mumbai - 400020.


जावक क्र. MHIT/OW/०६२६/००1254
दिनांक __/__/२०२६

प्रति,
मा. प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई.

विषय : महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित संस्थेचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या कालावधीतील वार्षिक अहवाल विलंबाने सादर करण्याबाबत स्पष्टीकरण.

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून विनम्र निवेदन करण्यात येते की, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (MahaIT) ही संस्था सन २०१६ मध्ये स्थापन झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात विविध शासकीय प्रकल्पांचे हस्तांतरण, संस्थात्मक रचना उभारणी, मनुष्यबळ उपलब्धता तसेच लेखापरीक्षण व वित्तीय विवरणपत्रे अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू होती.

सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या कालावधीतील वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी संबंधित वर्षांची लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्रे, संचालक मंडळाची मान्यता, वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी तसेच कंपनी अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण होणे आवश्यक होते. सदर प्रक्रिया विविध प्रशासकीय व वैधानिक कारणांमुळे टप्प्याटप्प्याने पूर्ण झाल्याने वार्षिक अहवालांचे संकलन व सादरीकरण अपेक्षित कालावधीत पूर्ण होऊ शकले नाही.

सर्व आवश्यक मंजुरी व वैधानिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित कालावधीतील वार्षिक अहवाल एकत्रितपणे शासनास सादर करण्यात आले असून, शासनामार्फत ते विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

भविष्यात वार्षिक अहवाल निर्धारित कालमर्यादेत सादर करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व संस्थात्मक उपाययोजना करण्यात येत असून, अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

हे स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे, ही विनंती.

Maharashtra Information Technology Corporation Ltd. GOVT. OF MAHARASHTRA UNDERTAKING Mumbai

आपला विश्वासू,

(रवींद्र सावंत)
मुख्य वित्तीय अधिकारी
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित